ePaper

|| वर्ष - 7 | अंक - 362 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज TM

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 03 जूलै 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**उत्तरप्रदेश हादरले.. भोलेबाबाच्या सत्संगमध्ये चेंगराचेंगरी; 122 भाविक मृत्यूमुखी**



## आतील पानांत


- माझं लक्ष्य एकच तो चेंडू पकडायचा
- 'मला लोकांसाठी ते बदलायचे आहे'
- मोदींनी उडवली राहुल गांधींची खिल्ली
- सत्संगात चेंगराचेंगरी, १२२ मृत्यू!


### पालखी पंढरपूरसाठी मार्गस्थ, संत तुकोबांच्या

# वारीमध्ये समतेचीही दिंडी!

## » वारकरी परंपरेतून संविधान समता दिंडीचा अनोखा उपक्रम



**| पुणे | महाईन्यूज**

**आषाढी एकादशीनिमित्त संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी पंढरपूरसाठी मार्गस्थ झाल्या आहेत. या वारीमध्ये खास समतेची दींडीदेखील संत तुकोबांच्या वारीमध्ये सहभागी झाली आहे. संविधान ज्याची सुरुवात आपण भारताचे लोक म्हणजे इथला प्रत्येक नागरिक, प्रत्येक व्यक्तीला धरून आहे, ते संविधान या वारकरी परंपरेतून, या वारकरी दिंडीतून सर्वांपर्यंत पोहोचलं पाहिजे, याच उद्देशाने संविधान समता दिंडी महाराष्ट्रभर दरवर्षी काढली जाते.**

संविधान समता दिंडी वारीमध्ये दरवर्षी सामील होत असते. या संविधान समता दिंडीमध्ये महाराष्ट्रातील विविध संस्था, संघटना तसंच विविध वारकरी बांधव सामील होत असतात. तुकोबारायांच्या पालखीसह ही दिंडी पुढे पंढरपूरला जाते. त्याची सुरुवात समता भूमी म्हणजेच फुलेवाडा इथून होते. म्हणजेच समता भूमिती संतभूमी असा एकूणच प्रवास आपण यातून केला जातो.

संविधानाची सुरुवात आम्ही भारताचे लोक म्हणून आहे. भारतात इथला प्रत्येक नागरिक एकमेकांना जोडलेला आहे. या देशाचे संविधान बनलं तर संविधानावर या देशातील विविध संस्कृतींचा प्रभाव देखील आहे. संविधानात असणारी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मूल्य संविधानात प्रत्यक्षपणे न येता त्याचा एक संबंध या भारतीय संस्कृतीशी देखील आहे, या संत परंपरांमध्ये आहे.

महाराष्ट्राची ओळख आणि महाराष्ट्राची सर्वात मोठी संस्कृती म्हणजे वारकरी परंपरा, संविधानात ज्या मुल्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. ही मूल्य आपल्या या संस्कृतीत संत परंपरेतून पिढीने पिढी पुढे वाढत आली. संविधान असं म्हणतो, की बंधुतेने आपण जोडून राहू, त्याचप्रमाणे ही वारकरी परंपरा, संतांचे अभंग आपल्याला एकमेकांना जोडून ठेवतात.

अनेकांना संविधान हे एका विशिष्ट जातीचं किंवा एक विशिष्ट धर्माचं किंवा आपलं नाही असं देखील वाटतं, परंतु ते आपल्या सर्वांचा आहे आणि या देशात प्रत्येक घटना ही या संविधानाला धरूनच होत असते. या देशाला धरून ठेवणारं एक मोठं पुस्तक, एक मोठी व्यवस्था ती म्हणजे संविधान. त्यामुळे संविधानाची मूल्य आपल्या या प्रत्येक माणसापर्यंत पोहोचली पाहिजेत.




### पालखी पंढरपूरसाठी दिवेघाटातून मार्गस्थ

दिवेघाटमार्गी पालखी सासवडला जाते, त्यापूर्वी पालखीचं दिवेघाटातील दृष्य विहंगम असतो. दिवेघाटातील प्रवास सगळ्या कठीण असतो. याच कठीण प्रवासासाठी वारकरी मार्गस्थ झाले आहेत. पुणे ते सासवड हा लांबचा टप्पा पार करताना अवघड अशी दिवेघाटाची वाट चढून आल्यावर दमलेल्या पायांना योग विद्या धाम पिंपरी चिंचवड यांच्यातर्फे शास्त्रशुद्ध पद्धतीने योग साधक मसाज करुन देतात. एकवेळी साधारण 25 महिला व 25 पुरुष वारकऱ्यांचा मसाज होतो. हजारो वारकरी या सेवेचा लाभ घेतात. निवृत्त सहायक पोलीस आयुक्त सुरेश केकाने यांच्या पुढाकाराने ही वारकरी मसाज सेवा गेल्या 9 वर्षांपासून सुरू आहे. दिवे घाटातील हिरवाईन वारकऱ्यांना चालण्याची शक्ती मिळत होती. ही हिरवाई जणू काही पालखी सोहळ्यासाठी नटली होती, अशीच अनुभूती येत होती.

दिवे घाटातील हिरवाईन वारकऱ्यांना चालण्याची शक्ती मिळत होती. ही हिरवाई जणू काही पालखी सोहळ्यासाठी नटली होती, अशीच अनुभूती येत होती. अवघड असा दिवे घाट टाळ मृदुगांच्या गजरात भक्तिमय वातावरणात वारक-यांनी लिलया पार केला. शुक्रवारी पुण्यातील विश्रांतीनंतर शुक्रवारी मजल दरमजल करत हा सोहळा सोपानकाकांच्या सासवडनगरीच्या दर्शनाची ओढीने पुढे जात होता.

# पूररेषेतील 29 बंगल्यांवर हातोडा!

## राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणांचा पिंपरी महापालिकेला आदेश

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिका हद्दीतील चिखली रिव्हर रेसिडेन्सी गृहनिर्माण सोसायटीच्या पाठीमागील बाजूस इंद्रायणी नदीच्या पुररेषेत उभारलेल्या २९ अनधिकृत बंगल्यावर कारवाई करावी. सहा महिन्यात ही कारवाई पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणांने पिंपरी-चिंचवड महापालिकेला दिले आहेत. तसेच पर्यावरणाची हानी केल्याप्रकरणी बांधकामधारकांकडून पाच कोटी रुपयांचा दंडही वसूल करण्याचे निर्देश दिले आहेत.**



शहरातून वाहणाऱ्या इंद्रायणी नदीच्याकडेला शंभर मीटर परिसरात निळी पूररेषा आहे. या रेषेच्या आतमध्ये कोणतेही बांधकाम करता येत नाही. असे असताना चिखली रिव्हर रेसिडेन्सी गृहनिर्माण सोसायटीच्या पाठीमागे इंद्रायणी नदी पुररेषेत २९ बंगले उभारले आहेत. त्या ठिकाणी नागरिकांचे वास्तव्य सुरु झाले आहे. विनापरवानगी आणि बेकायदेशीर बांधकामे नागरिकांनी बांधली आहेत.याविरोधात पुण्यातील तानाजी गंभीरे यांनी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणांकडे तक्रार केली होती. साडेपाच एकरावर निळ्या पूररेषेत हे बंगले उभारले आहेत. अनधिकृत बंगले असून महापालिकेची कोणतीही परवानगी घेतली नाही.

बंगले उभारताना पर्यावरण संरक्षण आणि सुधारणा कायद्यांचे उल्लंघन केल्याचे गंभीरे यांनी निर्देशनास आणून दिले. त्यावर काही वर्षांपासून सुनावणी सुरू होती. सुनावणीअंती राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने सहा महिन्यांच्या आतमध्ये हे २९ बंगले पाडण्याचे आदेश दिले. बांधकाम धारकांना नोटीस द्यावी, त्यांची बाजू जाणून घ्यावी आणि कारवाई करावी. त्याचबरोबर पूररेषेतील निर्माणाधिन बांधकामावरही कारवाईचे आदेश दिले आहेत. न्यायाधिकरणाचे आदेश येताच महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी तातडीने अधिकाऱ्यांची बैठक घेतली. कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. महापालिका हद्दीतील चिखली रिव्हर रेसिडेन्सी गृहनिर्माण सोसायटीच्या पाठीमागील बाजूस इंद्रायणी नदीच्या पुररेषेत उभारलेल्या २९ अनधिकृत बंगल्यावर कारवाई करावी. सहा महिन्यात ही कारवाई पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणांने पिंपरी-चिंचवड महापालिकेला दिले आहेत. साडेपाच एकरावर निळ्या पूररेषेत हे बंगले उभारले आहेत. अनधिकृत बंगले असून महापालिकेची कोणतीही परवानगी घेतली नाही. बंगले उभारताना पर्यावरण संरक्षण आणि सुधारणा कायद्यांचे उल्लंघन केल्याचे गंभीरे यांनी निर्देशनास आणून दिले. त्यावर काही वर्षांपासून सुनावणी सुरू होती. सुनावणीअंती राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने सहा महिन्यांच्या आतमध्ये हे २९ बंगले पाडण्याचे आदेश दिले. बांधकाम धारकांना नोटीस द्यावी, त्यांची बाजू जाणून घ्यावी आणि कारवाई करावी. त्याचबरोबर पूररेषेतील निर्माणाधिन बांधकामावरही कारवाईचे आदेश दिले आहेत. न्यायाधिकरणाचे आदेश येताच महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी तातडीने अधिकाऱ्यांची बैठक घेतली.

### पाच कोटी रुपयांचा दंडही वसूल

रिव्हर रेसिडेन्सी गृहनिर्माण सोसायटीच्या पाठीमागील बाजूस इंद्रायणी नदीच्या पुररेषेत उभारलेल्या २९ अनधिकृत बंगल्यावर कारवाई करावी. सहा महिन्यात ही कारवाई पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणांने पिंपरी-चिंचवड महापालिकेला दिले आहेत. तसेच पर्यावरणाची हानी केल्याप्रकरणी बांधकामधारकांकडून पाच कोटी रुपयांचा दंडही वसूल करण्याचे निर्देश दिले आहेत.पूररेषेमधील २९ आणि निर्माणाधिन अनधिकृत बंगल्यावर कारवाईचे आदेश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दिले आहेत. त्यानुसार संबंधित बंगला मालकांना नोटीस देऊन त्यांची बाजू जाणून घेण्यात येणार आहे. त्यानंतर सहा महिन्यांच्या आत बांधकामावर कारवाई करून अहवाल सादर करण्यात येईल.

# व्यावसायिकांवर अन्याय होऊ देणार नाही - आ. शेळके

## कारवाईस स्थगिती, लोकांना विश्वासात घेऊन तोडगा काढणार

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**धबधब्याच्या पाण्यात वाहून गेल्यामुळे एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाल्यानंतर भुशी धरण परिसरातील अतिक्रमणांवर सुरू करण्यात आलेल्या धडक कारवाईस आमदार सुनील शेळके यांच्या मध्यस्थीमुळे जिल्हाधिकाऱ्यांनी तात्पुरती स्थगिती दिली.**




भुशी धरण परिसरात छोटे-मोठे व्यावसायिक व विक्रेते गेली कित्येक वर्षे व्यवसाय करीत आहेत. त्यावर सुमारे पाचशे कुटुंबांचा उदरनिर्वाह चालतो. दुर्घटनेनंतर कोणतीही पूर्वसूचना न देता प्रशासनाने परिसरातील अतिक्रमणांवर धडक कारवाई सुरू केल्यामुळे ही सर्व कुटुंबे रस्त्यावर आली. धबधब्याच्या पाण्यात वाहून गेल्यामुळे एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाल्यानंतर भुशी धरण परिसरातील अतिक्रमणांवर सुरू करण्यात आलेल्या धडक कारवाईस आमदार सुनील शेळके यांच्या मध्यस्थीमुळे जिल्हाधिकाऱ्यांनी तात्पुरती स्थगिती दिली. या प्रकाराची गंभीर दखल घेत आमदार शेळके यांनी जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून वस्तुस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली व कारवाईस थांबविण्याची मागणी केली. त्यानुसार कारवाई तात्पुरती स्थगित करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

येत्या दोन दिवसांत आपण स्वतः प्रांत अधिकारी व तहसीलदार यांच्या समवेत भुशी धरण परिसरात समक्ष पाहणी करणार आहोत. त्यानंतर संबंधित व्यावसायिक व विक्रेते यांच्याशी चर्चा करून व त्यांना विश्वासात घेऊन पुढील निर्णय घेण्यात येईल, असे आमदार शेळके यांनी सांगितले. कोणत्याही परिस्थितीत गोरगरीब विक्रेत्यांवर अन्याय होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही शेळके यांनी दिली.

### कोणीही घाबरून जाऊ नये

या भागातील छोटे-मोठे विक्रेते व त्यांच्या कुटुंबांच्या उपजीविकेचे साधन कोणालाही हिरावून घेऊ देणार नाही. आपण शेवटपर्यंत या व्यावसायिक व विक्रेत्यांच्या पाठीशी उभे राहू.लोकांना विश्वासात घेऊन मार्ग काढण्याची भूमिका राहील. त्यामुळे कोणीही घाबरून जाऊ नये, असे आवाहन शेळके यांनी केले.

## पावसाळी अधिवेशन : भोसरी मतदार संघातील

# प्रस्तावित रस्त्यांना 'गती'!

### महसूल मंत्री विखे-पाटील यांचे प्रस्ताव मान्य करून घेण्याचे आदेश

### भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी विधानसभा मतदार संघातील प्रस्तावित रस्त्यांच्या कामासाठी भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करणेकामी राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करण्याबाबत राज्य सरकारच्या वित्त विभागाकडून प्रस्ताव मान्य करुन घ्यावा, असे आदेश राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले आहेत. त्यामुळे वर्षानुवर्षे भूसंपादनाअभावी रखडलेल्या रस्त्यांची कामे मार्गी लागण्याच्या प्रक्रियेतला गती मिळणार आहे.**

मुंबई येथे सुरू असलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महसूल मंत्री विखे-पाटील यांची भेट घेतली. त्यावेळी रस्त्यांच्या कामांसाठी भूसंपादन हा प्रमुख अडथळा असून, त्या करिता निधी उपलब्ध व्हावा, अशी मागणी केली.

भोसरी विधानसभा मतदार संघातील वाहतूक सक्षम व्हावी आणि वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका व्हावी. या करिता आम्ही मुख्य रस्त्यासोतबतच काही अंतर्गत डीपी रस्तेही विकसित करण्यासाठी पाठपुरावा करीत आहोत. सदर रस्त्यांचे काम भूसंपादनाअभावी रखडली आहेत. तर भूसंपादन निधीअभावी लांबणीवर पडले आहे. त्यासाठी चऱ्होली गावातील अंतर्गत 18 मीटर व 30 मीटर रस्त्याचे भूसंपादन, मोशी, चोविसावाडी, वडमुखवाडी व चऱ्होली येथील 90 मीटर रुंद रस्ता भूसंपादन, तळवडे व चिखली भागातून जाणारे ७ रस्ते विकसित करणेसाठी भूसंपादन, इंद्रायणी नदी किनारी तळवडे, चिखली, डुडूळगाव, बोऱ्हाडेवाडी, मोशी व चऱ्होली भागातून जाणाऱ्या रस्त्याचे भूसंपादन करणे, इंद्रायणी नदीसुधार प्रकल्पासाठी जागेचे भूसंपादन करण्यासाठी निधी उपलब्ध करावा, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली. त्याला महसूल मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.



### पिंपरी-चिंचवडसाठी दोन पशू वैद्यकीय अधिकारी..

पिंपरी-चिंचवड शहरात सुमारे २० ते २५ हजार लहान-मोठी जनावरे आहेत. या जनावरांना मनपा हद्दीमध्ये महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन विभागामार्फत दोन पशू वैद्यकीय अधिकारी प्रतीनियुक्तीने देण्याबाबत महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सूचना केल्या आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका स्थापन होण्यापूर्वी चऱ्होली येथे जिल्हा परिषद मार्फत पशु शल्यचिकीत्सालय सेवा पुरवली जात होती. मात्र, महापालिकेच्या स्थापनेपासून अशी सुविधा नाही. दोन पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध झाल्यास पशुपालकांना दिलासा मिळणार आहे.

### तलाठी कार्यालयासाठी प्रस्ताव देण्याचे आदेश..

राज्य शासनाच्या महसूल विभागाने दि. ७ डिसेंबर २०२२ रोजी तलाठी साझा पुनर्रचना समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने पुनर्रचना करण्यात आलेलया तलाठी साझे व महसूल मंडळाकरिता पदनिर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, चिंचवड तलाठी कार्यालयाचे विभाजन करुन निगडी, तसेच, देहू, भोसरी, मोशी असे नवीन मंडळ निर्माण केले आहेत. चिखली, बोऱ्हाडेवाडी, तळवडे, भोसरी-१, भोसरी-२, दिघी, बोपखेल, मोशी, डुडूळगाव, चऱ्होली बु. चोविसावाडी, वडमुखवाडी या तलाठी मंडळ कार्यालयांकरिता हक्काची जागा आणि इमारत उभारणीसाठी निधी उपलब्ध करावा, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली. यावर सदर जागेकरिता प्रस्ताव सादर करावा, असे आदेश महसूल मंत्री विखे-पाटील यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

---

# जिजामाता रुग्णालयातील पैशांवर अधिकाऱ्यांचा 'दरोडा'

### काँग्रेसच्या सायली नढे यांचा आरोप : दोन महिन्यात सुमारे 10 लाख हडप केल्याचा दावा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या पिंपरी येथील जिजामाता रुग्णालयात रोजच्या रोज जमा होणाऱ्या भरणा रकमेत मोठा भ्रष्टाचार झाला आहे. ०१ मार्च २०२४ ते ३० एप्रिल २०२४ या दोन महिन्यांच्या कालावधीत ९ लाख ७६ हजारांचा ६९१ रुपयांची रक्कम जिजामाता रुग्णालय कर्मचाऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी हडप केली असल्याचा आरोप काँग्रेसच्या महिला शहराध्यक्षा सायली नढे यांनी मंगळवारी (दि.२) पत्रकार परिषदेत केला आहे. ही बाब माहिती अधिकारातून उघड झाली असल्याचे नढे यांनी यावेळी सांगितले.**

पिंपरी येथे आयोजित पत्रकार परिषदेस माजी नगरसेविका निगार बारस्कर, माजी सभापती अभिमन्यू दहीतुले, शहर काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे, युवक अध्यक्ष कौस्तुभ नवले, परिवहन विभाग प्रदेश उपाध्यक्षा स्वाती शिंदे, डॉक्टर सेलच्या शहराध्यक्षा डॉ. मनीषा गरुड, किरण नढे आदी उपस्थित होते.

सायली नढे म्हणाल्या की, जिजामाता रुग्णालयात रोजच्या रोज जमा करण्यात येणाऱ्या रक्कमेच्या भरणा रजिस्टरमध्ये अफरातफर झाली आहे. रोजच्या रोज जमा होणारी भरणा रक्कम बँकेत न भरता तिचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर अधिकाऱ्यांनी केला आहे. रुग्णांकडून जमा होणारी रक्कम रोजच्या रोज न भरता नंतरच्या तारखेला भरण्यात आली. १ मार्च ते ३० एप्रिल २०२४ या कालावधीमध्ये एकूण रक्कम १८ लाख ६६ हजार ३५६ रुपये इतकी झालेली आहे. त्यामधील फक्त ८ लाख ८९ हजार ६६५ रुपये इतकी रक्कम बँकेत भरण्यात आली आहे. उर्वरित रक्कम रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच वैद्यकीय विभागातील अधिकाऱ्यांनी मिळून या रकमेचा भ्रष्टाचार केला आहे. भरणा रक्कम ही रोजच्या रोज भरण्यात येते, ही रक्कम जमा करण्याकरता बँक ऑफ बडोदा या बँकेतील कर्मचारी रोजच्या रोज हॉस्पिटलमध्ये येऊन भरणा रक्कम घेऊन जातात. मात्र, जिजामाता रुग्णालयातील भरणा रक्कम रोजच्या रोज जमा होत नसताना बँकेचे अधिकाऱ्यांनी भरणा रजिस्टरवर बँकेचे शिक्के मारलेले आहेत. तसेच रोजच्या रोज ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी रुग्णालयामध्ये उपस्थित असताना रजिस्टर व बँक चलनावरती दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सह्या उपलब्ध आहेत. यामधील वैद्यकीय अधिकारी डॉ. जितेन होतवानी रुग्णालयामध्ये अनुपस्थित असताना त्यांच्या सह्या भरणा रजिस्टर व बँक चलनावरती उपलब्ध आहे. त्यामुळे यावरून स्पष्ट होतं की आरोग्य वैद्यकीय अधिकारी, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, लिपिक, बँक अधिकारी तसेच वैद्यकीय विभाग, लेखा विभागाच्या अधिकाऱ्यांनी संगममताने महापालिकेच्या पैशाची मोठी अफरातफर केली आहे. अशी माहिती सायली नढे यांनी यावेळी दिली.




> सदर प्रकरणात महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय विभागाचे प्रमुख आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनिता साळवे, वैद्यकीय अधिकारी डॉ. जितेन होतवानी, वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली बांगर, डॉ. विकल्प भोई, लिपिक आकाश गोसावी या सर्व अधिकारी कर्मचारी यांनी आपल्या पदाचा गैरवापर केला आहे. त्यामुळे या सर्वांचं निलंबन करून संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी चौकशी समिती नेमवून जिजामाता हॉस्पिटल व इतर सर्व हॉस्पिटलचे ऑडिट करण्यात यावे.
>
> **– सायली किरण नढे,**
> शहराध्यक्षा, पिंपरी चिंचवड शहर जिल्हा महिला काँग्रेस कमिटी

### सायली नढे यांनी उपस्थित केलेले संशयास्पद मुद्दे..

१) ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनीता साळवी व वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली बांगर हे या कालावधीत रुग्णालयामध्ये हजर असताना त्यांनी गैरहजर असलेल्या वैद्यकीय अधिकारी डॉ. जितेन होतवानी यांच्या नावाच्या सह्या कोणी केल्या? किंवा त्यांना त्या कागदपत्रावरती सह्या कोणी करायला लावल्या?

२) ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनिता साळवी व वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली बांगर या अधिकारी या कालावधीमध्ये उपस्थित असताना डॉ. विकल्प भोई यांना भरणार रजिस्टरवर सह्या का करायला लावल्या?

३) रुग्णालयामध्ये जमा होणाऱ्या रकमेच्या भरणा रोजच्या रोज बँकेत भरला जात नसताना त्या भरणा रजिस्टरवर व भरणा बँक चलनावरती गैरहजर वैद्यकीय अधिकारी कोणाच्या सांगण्यावरून सह्या करत होता.



## भूमिका

# बेकायदा न्यायाची ‘तृणमूल’ शैली

**पश्चिम बंगाल आणि राजकीय हिंसाचार हे समीकरण तसे जुनेच. कोणताही पक्ष सत्तेत असो, या हिंसेची धग सतत जाणवत असते. तृणमूल काँग्रेस सत्तेत येईपर्यंत केवळ निवडणुकीच्या काळातच दिसणाऱ्या हिंसेने आता व्यापक स्वरूप धारण केल्याचे दिसते.**

उत्तर दिनाजपूर जिल्ह्याच्या लाखीपूर गावात परपुरुषाशी संबंध असल्याच्या केवळ संशयावरून तृणमूलच्या कथित कार्यकर्त्याने एका महिलेला केलेली अमानुष मारहाण हे त्याचे ताजे निदर्शक. प्रगतीचे कितीही दावे केले तरी विविध धर्म व जातीजमातीत न्याय देण्यासाठी भरणाऱ्या पंचायती हे देशातले वास्तव आजही कायम आहे. बंगालमध्ये या पंचायतींना ‘शोलिशी सभा’ म्हणून ओळखले जाते. अशा सभांवर हुकूम चालत असतो तो सत्ताधाऱ्यांचा. स्वत:ला जेसीबी म्हणवून घेणाऱ्या ताजीमुल इस्लाम नावाच्या टिनपाट कार्यकर्त्याने याच सभेचा आधार घेत महिलेला मारण्याची ‘मर्दुमकी’ दाखवली. या दुर्दैवी घटनेची चित्रफीत सर्वत्र प्रसारित झाल्यावर व देशभरातील सर्वच राजकीय पक्षांनी टीकेची झोड उठवल्यावर पोलिसांनी त्याला अटक केली असली, तरी यामुळे स्वत:ला ‘सेक्युलर’ म्हणवून घेणाऱ्या ममता बॅनर्जींच्या कारभारावर भलेमोठे प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे. निवडणुका संपल्या, त्यात तृणमूलला भरघोस यश मिळाले तरीही या राज्यातला हिंसाचार का थांबत नाही याचे उत्तर सत्ताधाऱ्यांच्या दडपशाही




वृत्तीत दडले आहे. एका विशिष्ट धर्मसमुदायाला सांभाळले, त्यांच्या धार्मिक आकांक्षांना खतपाणी घातले व त्या बळावर त्यांची मते मिळवली की विजयापासून आपल्याला कुणीही रोखू शकत नाही अशी मानसिकता सध्या तृणमूलची झालेली आहे. यातूनच या बेकायदा न्यायनिवाडा करणाऱ्या सभांना बळ देण्यात आले. जमिनीचे प्रकरण असो, प्रेमविवाहाची परवानगी असो वा कौटुंबिक वाद. या साऱ्याच गोष्टींचा निर्णय सभांमधून घ्यायचा व निवाडा देणारा तृणमूलचाच पदाधिकारी असेल याची व्यवस्था करायची. प्रत्येक गावपातळीवर सुरू झालेला हा प्रकार ‘कायद्याचे राज्य’ ही संकल्पनाच मोडीत काणारा आहे.

या प्रकरणातील आरोपी हा तृणमूलचे स्थानिक आमदार हमीदुल रेहमान यांचा कार्यकर्ता आहे असे सांगितले गेले. याचा तातडीने इन्कार करणाऱ्या या आमदाराने ‘इथे फक्त तृणमूलचे कार्यकर्ते आहेत. विरोधक कुणीच नाही’ अशी दिलेली प्रतिक्रिया या राज्यात नेमके चालले काय यावर प्रकाश टाकणारी आहे. पक्षाचा प्रवक्ता सोडला तर ममतांसकट एकाही मोठ्या नेत्याने यावर प्रतिक्रिया दिलेली नाही. राजकीय यश मिळवण्यासाठी मी महिला असे सांगायचे व महिलांवरील अत्याचार समोर आला की मौन, हे ममता बॅनर्जींना शोभणारे नाही. याच राज्यात अगदी निवडणुकीच्या काळात संदेशखाली प्रकरण घडले. नंतर उपचारासाठी आलेल्या एका बांगलादेशी खासदाराची कोलकत्यात हत्या झाली. ते कृत्य करणारे त्याच देशातून आले व निघूनही गेले. याला कायदा व सुव्यवस्थेचे राज्य तरी कसे म्हणायचे? अशा घटना घडल्या की भाजपशासित राज्यांमध्ये होणाऱ्या हिंसाचाराकडे बोट दाखवण्याचे काम ममता व त्यांचा पक्ष आणखी किती काळ करणार? समोरचे वाईट असतीलही पण तुमचे काय? तुमची कार्यशैली कधी सुधारणार? टीका किंवा आरोपांना प्रत्युत्तर देत पक्षसमर्थकांनी चालवलेल्या हिंसाचाराकडे दुर्लक्ष करणे म्हणजे राज्य चालवणे असे कसे म्हणता येईल? भाजपचे विरोधक म्हणून देशाला धर्मनिरपेक्षतेचे ज्ञान शिकवायचे पण स्वत:च्याच राज्यात हिंसेकडे कानाडोळा करून धार्मिक दुभंग निर्माण करायचा हे कायद्याच्या कोणत्या चौकटीत बसते? हाती असलेली सत्ता टिकवण्यासाठी तृणमूलने सध्या या राज्यात प्रत्येक गोष्टीकडे राजकीय दृष्टिकोनातून बघणे सुरू केले आहे. मते दिली नाही म्हणून ‘लोख्मीर भांडार’ या फेब्रुवारी २०२१ पासून सुरू असलेल्या (लाडकी बहीणसारख्या) योजनेतून लाभार्थी महिलांची नावे वगळण्याचा प्रकारसुद्धा अलीकडे उघड झाला. कुणाला जमीन विकत घ्यायची असेल तर तृणमूलच्या सरपंचाचा शब्द अंतिम. कुणावर गुन्हा दाखल करायचा तरी पक्षाच्या ‘कॅडर’कडून निरोप मिळाल्याशिवाय नाही. तुमच्या घरात दोन मुली आहेत हे लक्षात ठेवा व पक्षाच्या रॅलीला हजेरी लावा, अशी धमकी देण्यापर्यंत कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची मजल गेलेली. कायदा हातात घेण्यात काहीही गैर नाही अशी वृत्ती सत्तासमर्थकांत बळावल्यानेच ही घटना घडली. ती घडून चार दिवस लोटले तरी पोलिसांनी काहीही हालचाल केली नाही. चित्रफितीला पाय फुटल्यावर ते जागे झाले.

## प्रासंगिक »

### नाही भाषांतर पुरेसे...

***कायदा आधुनिक आहे की मागास हे त्या कायद्याचा वापर करणाऱ्याच्या मानसिकतेवरून ठरते; हे नव्या गुन्हेकायद्यांनाही लागू आहेच...***

आजपासून नव्या फौजदारी भारतीय दंड संहितेचा अंमल सुरू झाला. राजधानीत जुन्याच गुन्ह्यासाठी जुन्याच गुन्हेगारावर नव्या संहितेखाली नव्या व्हिडीओ-पुरावा पद्धतीने गुन्हा नोंदवून १ जुलै रोजी नव्या संहितेचे ‘उद्‌घाटन’ करण्यात आले. छान. संसदेत त्यासाठी मध्यरात्री एखादे विशेष अधिवेशन वगैरे बोलावले गेले नाही हेही छान.ती गरज या नव्या संहितेमुळे पूर्ण होईल. यासाठी नवी संहिता तयार करण्याचा प्रयत्न गेली चार वर्षे सुरू होता. खुद्द गृहमंत्री अमित शहा यांनी या संदर्भात शब्दश: शेकडो बैठका घेतल्या आणि तज्ज्ञांशी चर्चा केली. आता अखेर ही नवी दंड संहिता अमलात येत असून त्यानुसार १८६० सालची ‘भारतीय दंड संहिता’, १८९८ची गुन्हेगारी प्रक्रिया संहिता आणि १८७२चा ‘भारतीय पुरावा कायदा’ यांच्या जागी अनुक्रमे भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय पुरावा कायदा हे तीन कायदे अस्तित्वात येतील.

२०१९ साली जनमत पायदळी तुडवून निर्माण झालेल्या अनैसर्गिक आघाडीच्या विरोधात आम्ही केलेल्या ऐतिहासिक उठावानंतर महाराष्ट्रात महायुतीचे सरकार स्थापन झाले. राज्यात जनतेच्या मनातील सरकार स्थापन झाले, त्याला दोन वर्षे पूर्ण झाली आहेत.

# विचार, विकास आणि विश्वास!

विकसित राज्याचे स्वप्न डोळ्यात घेऊन हाती घेतलेल्या कारभाराच्या केंद्रस्थानी सामान्य माणूस असला पाहिजे, हा ध्यास होता. राज्याने आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रात घोडदौड केली पाहिजे, अशी आस होती. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचावा, अशी धडपड होती. शेतकरी, महिला, युवक यांच्या चेहऱ्यावर समाधान, आनंद दिसावा, अशी इच्छा होती. दोन वर्षांत या सर्वच आघाड्यांवर सरकारने लक्षणीय कामगिरी केली आहे. शिवसेनेचा, हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विचार आम्ही जिवापाड जपला आहे. विकासासाठी अहोरात्र काम केले. त्यातूनच जनतेचा विश्वास आम्ही कमावला याचा आनंद आणि समाधान हे माझे संचित आहे. दोन वर्षे हा काही तसा फार मोठा काळ नाही, परंतु महायुतीच्या दृष्टीने गेल्या दोन वर्षांचा काळ हा मोठ्या कसोटीचा होता. महायुती या कसोटीत १०० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे, हे



आज लक्षात येते. सामान्य माणसाच्या चेहऱ्यावरील समाधान हेच महायुतीच्या दोन वर्षांच्या परिश्रमाचे फलित आहे. देशाचे लोकप्रिय आणि यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदीजी तसेच कणखर केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह यांचे मार्गदर्शन आणि त्यांचे पाठबळ आम्हाला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि महायुतीच्या सर्वच सहकाऱ्यांची साथ आहे. त्यामुळेच गेल्या दोन वर्षांत राज्याने उत्तुंग भरारी घेतली आहे. आपण सर्व या प्रगतीचे केवळ साक्षीदार नाही तर साथीदार आहात. लोकशाहीत लोकांच्या वतीने लोकप्रतिनिधी राज्य चालवीत असतात. गेल्या दोन वर्षांत आम्ही एक क्षणही हे भान सुटू दिले नाही.नुकताच राज्याचा अर्थसंकल्प सादर झाला, त्यात अनेक महत्त्वाकांक्षी आणि क्रांतिकारी योजना आपण जाहीर केल्या.मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेतून तीन गॅस सिलिंडर विनामूल्य मिळतील. मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेतून जवळपास ४४ लाख शेतकऱ्यांच्या कृषिपंपांना विनामूल्य वीजपुरवठा केला जाणार आहे. युवकांना त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी आर्थिक मदत देणाऱ्या मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेतून जवळपास १० लाख तरुणांना प्रत्येकी १० हजार रु.पर्यंतचा स्टायपेंड दिला जाणार आहे. ज्येष्ठांना धार्मिक स्थळांचे दर्शन घडविणारी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनाही सुरू होत आहे. या सर्व योजनांतून दोन वर्षांच्या कामगिरीचा सर्वोच्चबिंदू गाठला आहे. आजवर अमलात आणलेल्या योजना आणि आता जाहीर करण्यात आलेल्या योजनांवर लाखो कोटी रुपये खर्च होणार आहेत. मात्र, या योजनांचे स्वागत करण्याऐवजी विरोधक ‘यासाठी पैसा कुठून आणणार?

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# दानवे पाच दिवसांसाठी निलंबित!

## विरोधकांच्या गोंधळात कामकाज तीनवेळा तहकूब

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधान परिषद सभागृहात बेशिस्त वर्तन केल्याचा ठपका ठेवत, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे विधान परिषदेतून पाच दिवसांसाठी निलंबित करण्यात आले. विरोधी पक्षनेत्यावर निलंबनाची कारवाई करण्याची महाराष्ट्राच्या इतिहासातील हि पहिलीच घटना असल्याचे बोलले जात आहे .**





संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दानवे यांच्या निलंबनाचा ठराव विधान परिषदेत वाचून दाखविला. उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी तो आवाजीमताने मंजूर केला. तसेच निलंबनाच्या काळात विधानभवनाच्या परिसरात त्यांना येण्यासदेखील त्यांच्यावर बंदी घालण्यात आली .दरम्यान उपसभापतींनी अचानक निलंबनाचा निर्णय जाहीर केल्याने विरोधकांनी आक्रमक होत, सभागृहात घोषणाबाजी करीत प्रचंड गदारोळ केला . ही पक्षपाती भूमिका आहे, असा आरोप करत विरोधकांनी सभात्याग केला. तत्पूर्वी सत्ताधारी व विरोधकांच्या गोंधळात उपसभापती गोऱ्हे यांना तीनवेळा सभागृहाचे कामकाज तहकूब करावे लागले.लोकसभेत भाजपवर निशाणा साधताना राहुल गांधी यांनी काल हिंदुत्वावर भाष्य केले. विधान परिषदेत याचे तीव्र पडसाद उमटले. भाजपचे प्रसाद लाड यांनी निषेधाचा ठराव मांडण्याची मागणी केली. दरम्यान, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि लाड यांच्यात तूतू- मैंमैं झाली. दानवेंनी भर सभागृहात लाड यांना आक्षेपार्ह विधान केले.

मंगळवारी परिषदेचे कामकाज सुरू होताच, भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी राज्यातील माजी नेत्यांचे दाखले देत, विरोधी पक्षनेते दानवे यांच्या विधानांचा समाचार घेतला. दानवे यांनी विधिमंडळाच्या परंपरेला काळीमा फासण्याचे काम केले. त्यांना निलंबित करा, अन्यथा कामकाज होऊ देणार नाही, असा पवित्रा घेतला. यावेळी झालेल्या गोंधळात उपसभापती गोऱ्हे यांनी सकाळी एक तासासाठी सभागृहाचे कामकाज तहकूब केले. त्यानंतर गोंधळात आणखी दोन वेळा सभागृहाच कामकाज तहकूब केले.दुपारी दोन वाजता सभागृहाचे कामकाज सुरु होताच संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यावरील निलंबनाचा ठराव मांडला. १ जुलै रोजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सभागृहात चर्चा करीत असताना सभागृहाचे सदस्य प्रसाद लाड यांच्या बाबत आक्षेपार्ह, अशोभनीय, अश्लाघ्य शब्द वापरुन व बेशिस्त वर्तन करून सभागृहाची प्रतिष्ठा मलिन केली. तसेच सर्वोच्च सभागृहाचा अवमान केला आहे, अशा गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यास संसदीय प्रथांचे अवमुल्यन होऊन सभागृहाच्या कामकाजाबाबत चुकीचा पायंडा पडेल. त्यांच्या बेशिस्त व अशोभनीय वर्तनाची गंभीर दखल घेत, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे सदस्यत्व पावसाळी अधिवेशनात पाच दिवसांसाठी निलंबित करण्यात यावे असा ठराव पाटील यांनी वाचून दाखविला . तसेच निलंबनाच्या काळात विधानसभेच्या परिसरात त्यांना प्रवेश करण्यास बंदी घालण्याची मागणी केली. दानवे यांच्या निलंबनाच्या ठरावाविरोधात विरोधकांनी चर्चेची मागणी यावेळी लावून धरली. दरम्यान, उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी ठराव वाचून दाखवत असल्याचे सांगितले. मात्र, चर्चा करू देणार नसाल तर निदान दानवे यांना तरी त्यांच्या बाजू मांडण्याची संधी द्यावी, अशी मागणी विरोधकांनी केली. मात्र सभापतींनी ही मागणी फेटाळून लावत, निलंबनाच्या ठरावाचा प्रस्ताव आवाजी मतदानाने मंजूर केला. दानवे यांचे निलंबन झाल्याने त्यांना बोलता येणार नाही.

### नियमानुसार कारवाई- फडणवीस

त्यामुळे विरोधकांनी वेलमध्ये येऊन सभापती हायहाय, न्याय द्या,न्याय द्या , बहुमताच्या जोरावर निर्णय घेणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, अशा घोषणा देत सभात्याग करत दिवसभरासाठी कामकाजावर बहिष्कार घातला.यावेलो बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ठरावावर चर्चा होत नाही. होणार नाही आणि झालेली नाही. यापूर्वीही अनेक जणांवर अनेक कारणांमुळे अशी कारवाई झालेली आहे. त्यावेळी ठरावावर चर्चा करण्यात आलेली नाही. त्यामुळे निलंबनाच्या या ठरावावर चर्चा होणार नाही. ठरावावर मतदान घेण्यात येते. त्याप्रमाणे मतदान घेण्यात आले आहे. त्यामुळे निलंबनाची कारवाई नियमानुसार झालेली आहे, असेही फडणवीस म्हणाले.विधान परिषदेत सोमवारी घडलेला प्रसंग अत्यंत क्लेशदायक होता. मी एक महिला असून उपसभापती आहे. महिला लोकप्रतिनिधींच्या समोर एक विरोधी पक्षनेता अशा भाषेत बोलायला लागला तर उद्या जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि महापालिकांच्या महापौरांसमोर प्रत्येकजण अशा भाषेत बोलू लागतील. त्यामुळे महिलांना काम करणे मुश्किल होऊन जाईल, अशी भीती व्यक्त करत ही कुठल्याप्रकारची संस्कृती रुजवली जात आहे. खरेतर त्यांच्या नेत्यांनी विचार करायला पाहिजे, असा टोला उपसभापती गोऱ्हे यांनी लगावला.

# नाव शिंदेंचं, पण निशाणा अजित पवारांवर?

## जयंत पाटलांनी सांगितला शिवराजसिंह चौहानांचा किस्सा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माझी लाडकी बहीण योजने’च्या माध्यमातून घरबसल्या दर महिन्याला १,५०० रुपये, ५२ लाख वर्षाला तीन मोफत गॅस सिलेंडर, १० हजार ई-रिक्षा खरेदीसाठी अर्थसाहाय्य, मुलींना मोफत उच्चशिक्षण आदी विविध योजनांचा वर्षाव केला**

महायुती सरकारने या योजनेद्वारे महाराष्ट्रातील महिला मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. राज्य सरकाने शुक्रवारी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पाद्वारे लाडकी बहीण योजनेची घोषणा करण्यात आली आहे. दरम्यान, या योजनेवरून राज्यात सर्वत्र वेगवेगळ्या प्रकारची चर्चा पाहायला मिळत आहे. ही योजना आगामी निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन सादर केल्याचा आरोप विरोधकांकडून होत आहे. अशातच आज (२ जुलै) विधानसभेत या योजनेवर चर्चा करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस



पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी या योजनेवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवारांना चिमटा काढला.मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सर्वप्रथम ही योजना त्यांच्या राज्यात लागू केली होती. या योजनेचा त्यांना आणि राज्यातील भाजपा सरकारला मोठा फायदा झाला. नुकत्याच झालेल्या मध्य प्रदेश विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत राज्यातील महिला मतदारांनी चौहान यांच्या बाजूने मतदान केलं. चौहान यांनी ज्या पद्धतीने राज्यातली सत्ता राखली त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस-पवार सरकारही तोच प्रयत्न करत असल्याची त्यांच्यावर टीका होत आहे. दरम्यान, हाच धागा पकडून जयंत पाटलांनी विधानसभेत भाषण केलं.जयंत पाटील म्हणाले, शिवराज सिंह चौहान यांनी मध्य प्रदेशमध्ये ‘लाडली बहन’ योजना राबवली.

### आम्हाला त्यांच्याकडून अपेक्षा होती

त्या भागात, चौहान यांच्या राज्यात ही योजना खूप लोकप्रिय झाली. परंतु, शिवराज सिंह चौहान यांना परत मुख्यमंत्री होता आलं नाही. एकनाथ शिंदे यांना ही गोष्ट माहिती आहे की नाही हे मला माहिती नाही. परंतु, या योजनेनंतर शिवराज सिंह चौहान यांच्यावर काय गंडांतर आलं हे मुख्यमंत्र्यांच्या (एकनाथ शिंदे) लक्षात आलेलं असावं, म्हणूनच त्यांनी ही योजना मांडली नाही. त्यांनी ही योजना अजित पवार यांना मांडायला लावली.

# सत्संगात चेंगराचेंगरी, 122 मृत्यू!

## रुग्णालयाबाहेर मृतदेहांचा खच; दीडशेहून अधिक जखमी

**। नवी दिल्ली ।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**उत्तर प्रदेशातील हाथरसमध्ये भोले बाबांच्या सत्संगादरम्यान चेंगराचेंगरीची घटना मंगळवारी दुपारी घडली. यामध्ये १२२ जणांचा मृत्यू झाला तर १५० हून अधिक जखमी झाले आहेत. अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अपघातानंतरची परिस्थिती भयावह आहे. रुग्णालयाच्या बाहेर जमिनीवर मृतदेह विखुरलेले आहेत. हाथरसमध्ये पडलेलल्या ृतदेहांची मोजणी केली असता ते ९५ असल्याचे आढळले. याशिवाय एटा हॉस्पिटलमध्ये हाथरसमधून २७ मृतदेह आणण्यात आले आहेत. यामध्ये २५ महिला आणि २ पुरुष आहेत. असे एकूण १२२ जण या दुर्घटनेत मरण पावले आहेत. सीएमओ उमेश त्रिपाठी म्हणाले, की मृतदेह आणि जखमींना टेम्पोमध्ये आणण्यात आले.**



मृतदेहांचा पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यानंतर पोस्टमॉर्टम केले जाईल. सत्संगात २० हजारांहून अधिक लोकांची गर्दी होती. ही घटना नेमकी कशी घडली, यांसदर्भातील तपास सुरू आहे. दरम्यान, या घटनेनंतर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. हाथरस येथे घडलेली घटना दुर्दैवी आहे. या घटनेत ज्यांचा मृत्यू झाला, त्यांच्या कुटुंबियांप्रती मी संवेदना व्यक्त करतो. या ठिकाणी बचाव व मदतकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. जखमींना उपचाराकरिता रुग्णालयात दाखल करण्यात येत आहे, असे योगी आदित्यनाथ म्हणाले.या घटनेने भोलेबाबाच्या भक्तांवर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सत्संगात भाविक तल्लीन झाले होते. तेव्हाच अचानक चेंगराचेंगरीला सुरुवात झाली. कोणी पायाखाली चिरडल्या गेले. तर काही जणांचा गुदमरुन मृत्यू झाला. घटनेने आयोजकांसह भाविकभक्तांच्या नातेवाईकांना पण धक्का बसला आहे. यावेळी सरकारी रुग्णालय आणि खासगी रुग्णालयाबाहेर नातेवाईकांच्या आक्रोशाने सर्वांचीच मने हेलावली. अपघातानंतर इतके जखमी झाले की सरकारी रुग्णालये फुलून गेली. सीएचसीच्या बाहेर काही लोक वेदनेने तडफडताना दिसले. हाथरस प्रशासनाने खासगी रुग्णालयांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. प्रत्येकाला बेड आरक्षित करण्यास सांगितले आहे. जखमींना आता खासगी रुग्णालयात दाखल करण्यात येत आहे. घटनास्थळी परिस्थिती नियंत्रणाबाहेर आहे. गर्दी आणि मृतदेहांमध्ये प्रत्येकजण आपल्या प्रियजनांचा शोध घेत आहे.हाथरसपासून ४७ किलोमीटर अंतरावर असलेल्या फुलराई गावात हा अपघात झाला. अपघातानंतर कसेबसे जखमी आणि मृतांना बस-टेम्पोमध्ये भरून रुग्णालयात नेण्यात आले. मुख्यमंत्री योगी यांनी मुख्य सचिव मनोज सिंह आणि डीजीपी प्रशांत कुमार यांना घटनास्थळी पाठविले. घटनेच्या कारणाचा तपास करण्यासाठी एडीजी आग्रा आणि अलिगढ आयुक्तांची एक टीम तयार करण्यात आली आहे. या घटनेत मरण पावलेलल्यांमध्ये बहुसंख्य महिला आणि चिमुकल्यांचादेखील समावेश आहे. हाथरस येथील रतिभानपूर येथे झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेत १२२ जणांचा मृत्यू झाला. या घटनेत दीडशेपेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. मृत आणि जखमींमध्ये महिला आणि लहान मुलांचा समावेश आहे. जखमींना एटा मेडिकल कॉलेज येथे भर्ती करण्यात आले आहे.

### मुख्यमंत्री योगींनी दिले आदेश

रतिभानपूर येथील सिकंदराराऊ कोतवालीच्या फुलराई गावात भोले बाबांचा सत्संग महोत्सव सुरू होता. या सत्संग कार्यक्रमाला परवानगीही देण्यात आली होती. एका अंदाजानुसार १.२५ लाख लोक या सत्संगसाठी आले होते. गर्दी आणि प्रचंड उष्णतेने अनेक भक्त बेशुद्ध पडले. त्यामुळे अफरातफरी माजली. प्रत्यक्षदर्शीने दिलेल्या माहितीनुसार सत्संग सोहळ्यात प्रचंड गर्दी होती. बाहेर पडण्याचा रस्ताही लोकांमुळे जाम झाला होता. त्याचवेळी भक्तांमध्ये धक्काबुक्की झाली. सत्संग संपल्यानंतर चेंगराचेंगरी झाली. प्रत्येकाला एकाचवेळी बाहेर पडायचे होते, असेही काही जणांनी सांगितले. पोलिस आणि प्रशासनातर्फे बचावकार्य सुरु असून मृतदेहांचे पोस्टमॉर्टम केले जात आहे.कार्यक्रमादरम्यान अचानक चेंगराचेंगरी झाली. यात काही जण पायाखाली आले तर काही जणांचा गुदमरुन मृत्यू झाला. हाती आलेल्या माहितीनुसार या दुर्घटनेत मयतांचा आकडा १२२ वर पोहचला आहे. अनेकांना सार्वजनिक आरोग्य केंद्रात अनेकांना भरती करण्यात आले आहे तर या दुर्घटनेतील गंभीर भाविकांना जिल्ह्याच्या ठिकाणी उपचारासाठी हलविण्यात आले आहे. मयताचा आकडा वाढण्याची भीती सरकारी रुग्णालयातील अधिकाऱ्यांनी वर्तविली आहे. ही घटना नेमकी कशामुळे झाली.

# नरेंद्र मोदींनी उडवली राहुल गांधींची खिल्ली

## पडलेल्या लहान पोराचं मन रमवण्याचा काँग्रेसकडून प्रकार

**। नवी दिल्ली ।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राहुल गांधी यांनी १ जुलै रोजी जे भाषण केलं त्या भाषणात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, त्यांनी प्रचाराच्या वेळी स्वतःविषयी केलेले उल्लेख. हिंदुत्व, लोकसभा निवडणुकीचे निकाल, संघ, भाजपा या सगळ्यांवर भाष्य केलं. हिंदू समाज हिंसक असतो या त्यांच्या वक्तव्याचे पडसाद लोकसभेत उमटले तसंच महाराष्ट्रातही उमटले. त्यानंतर नरेंद्र मोदी हे काय बोलणार याची उत्सुकता होती. नरेंद्र मोदींनी आज राहुल गांधींची खिल्ली उडवली आहे.**

एक कालखंड देशाने पाहिला आहे की ज्यावेळी बेशरमपणे हे मान्य केलं जायचं की दिल्लीतून एखाद्या प्रकल्पासाठी १ रुपया निघाला योजनेपर्यंत १५ पैसे पोहचतात. १ रुपयात ८५ पैशांचा घोटाळा होत होता. घोटाळ्यांच्या खाईत देश बुडाला होता. शिफारस न करता काहीही मिळत नव्हतं. गरीबाला घर घ्यायचं असेल तर लाच द्यावी लागत होती. गॅस कनेक्शनसाठी खासदारांच्या घरी जावं लागायचं. वशिला लावून मग कनेक्शन मिळायचं आणि लाचही द्यावी लागायची. मोफत रेशनही लोकांना मिळत नव्हतं, त्यासाठी लाच द्यावी लागत होती. देशाने २०१४ मध्ये आम्हाला निवडलं आणि तो देशाच्या परिवर्तानाचा प्रारंभ



होता. १० वर्षांत आम्ही देशाचा आत्मविश्वास परत आणला. आज देशाचा आत्मविश्वास दुणावला आहे, भारत काहीही करु शकतो हे देशातल्या सामान्य माणसाला वाटतं. असं मोदी म्हणाले. तसंच राहुल गांधींचं नाव न घेता त्यांनी राहुल गांधींची खिल्ली उडवली. अध्यक्ष महोदय, “२०२४ च्या निवडणुकीने काँग्रेसलाही जनादेश मिळाला. हा जनादेश आहे की तुम्ही विरोधातच बसा. विरोधी पक्षात बसा आणि तर्क संपले की ओरडत राहा, किंचाळत राहा. काँग्रेसच्या इतिहासात सलग तीनवेळा काँग्रेस १०० जागाही जिंकू शकलेली नाही. काँग्रेसच्या इतिहासात हा तिसरा मोठा पराभव आहे. हा पराभव काँग्रेसने मोठ्या मनाने मान्य करायला हवा होता. जनादेश मान्य केला असता आणि अंतर्मुख होऊन विचार केला असता. मात्र काही लोक शीर्षासन करत आहेत.

### तू तर मस्त सायकल चालवतोस रे

त्यातल्या एकाही निवडणुकीत काँग्रेस २५० जागांच्या संख्येला स्पर्श करु शकलेला नाही.एखादा छोटा मुलगा जर सायकल घेऊन चालला असेल तो पडला, त्याला लागलं की तो रडू लागतो. ज्यानंतर घरातला मोठा माणूस त्याच्याकडे येतो. त्याला समजावतो त्याला सांगतो हे बघ मुंगी मेली, चिमणी उडाली, तू तर मस्त सायकल चालवतोस रे. तू पडला नाहीस रे. हे सांगून जरा त्या मुलाची समजूत घालण्याचा प्रयत्न करतात. त्याचं लक्ष दुसरीकडे केंद्रीत करतात त्याची पाठ थोपटतात. काँग्रेसमध्ये सध्या हेच सुरु आहे. पडलेल्या पोराची पाठ थोपटली जाते आहे. लहान मुलाची समजूत घातली जाते आहे.

# परदेशात अनवाणी फिरतेय देशमुखांची सून

बॉलीवूडसह दाक्षिणात्य चित्रपटसृष्टी गाजवणारी अभिनेत्री जिनिलीया जवळपास १२ वर्षांपूर्वी देशमुखांची सून झाली. अनेक वर्षे एकमेकांना डेट केल्यावर रितेश – जिनिलीयाने ३ फेब्रुवारी २०१२ रोजी थाटामाटात लग्न केलं. 'तुझे मेरी कसम' या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान या दोघांची एकमेकांशी ओळख झाली होती. याच चित्रपटाच्या सेटवर दोघांचं प्रेम जुळलं अन् पुढे रितेश-जिनिलीया रिलेशनशिपमध्ये आले. काही वर्षांनी दोघांनी जवळचे नातेवाईक, कुटुंबीय, बॉलीवूडचे कलाकारमंडळी यांच्या उपस्थितीत लग्न केलं.सध्याच्या घडीला रितेश-जिनिलीया महाराष्ट्राचे दादा-वहिनी म्हणून ओळखले जातात. मराठीसह बॉलीवूड कलाविश्वातील आदर्श जोडपं म्हणून या दोघांकडे पाहिलं जातं. मनोरंजन विश्वात या दोघांना एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रेम मिळण्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे यांचा साधेपणा व मनमोकळा स्वभाव. जिनिलीया सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असते. तिच्या सगळ्या चाहत्यांची ती मोठ्या आपुलकीने भेट घेते. याचे अनेक व्हिडीओ व्हायरल होत असतात. याशिवाय आघाडीची



अभिनेत्री असूनही ती मराठमोळे सण, परंपरा मोठ्या आनंदाने साजरे करते. रितेशच्या लाडक्या बायकोचा नुकताच न्यूयॉर्कच्या रस्त्यावर फेरफटका मारतानाचा व्हिडीओ सर्वत्र व्हायरल होत आहे. परदेशातील रस्त्यावर जिनिलीया अनवाणी फिरत असल्याचं पाहायला मिळत आहे. "न्यूयॉर्कच्या रस्त्यावर अनवाणी फिरतेय... आणि का नको फिरू यातच आनंद आहे" असं कॅप्शन देत जिनिलीयाने तिचा अनवाणी चालतानाचा व्हिडीओ इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केला आहे. परदेशात अनवाणी फिरताना जिनिलीयाने तिच्या गुलाबी रंगाच्या हाय हिल्स हातात घेतल्या होत्या. याशिवाय या व्हिडीओला अभिनेत्रीने "हसते हसते कट जाए रस्ते..." हे जुनं गाणं लावलं आहे. अभिनेत्रीचा हा व्हिडीओ सध्या सर्वत्र व्हायरल होत आहे.

## इच्छाशक्ती असणे माझ्यासाठी अशक्य

लेखक आणि गीतकार म्हणून मनोरंजनसृष्टीत वेगळे स्थान निर्माण केलेल्या अनेक नावांमध्ये जावेद अख्तर यांचे नाव अग्रस्थानी येते. लेखनाशिवाय ते आपल्या परखड वक्तव्यांमुळे मोठ्या चर्चेत असतात. आता मात्र त्यांची पत्नी आणि दिग्गज अभिनेत्री शबाना आझमी यांनी अरबाज खानच्या 'द इनव्हिन्सिबल्स' या कार्यक्रमात जावेद अख्तर यांच्या दारुच्या व्यसनाबद्दल वक्तव्य केले आहे.शबाना आझमी यांनी जावेद अख्तर यांच्या दारुच्या व्यसनाबद्दल बोलताना म्हटले आहे की, जेव्हा जावेद दारुच्या व्यसनात पूर्ण बुडाला होता तो काळ कठीण होता. तो दररोज रात्री दारुची एक पूर्ण बाटली संपवायचा. पण तो त्याच पद्धतीने दारु पित राहिला तर तो फार काळ जगू शकणार नाही, ही गोष्ट जेव्हा त्याच्या लक्षात आली तेव्हा त्याने दारु सोडण्याचा निर्णय घेतला.

## मिनिटासाठी 1 कोटी मानधन



बॉलीवूड सिनेसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या अनेक अभिनेत्री आहेत. आलिया भट्ट, दीपिका पदुकोण, प्रियांका चोप्रा अशा आघाडीच्या अभिनेत्रींना मागे टाकत एक अभिनेत्री अशी आहे; जी त्यांच्यापेक्षा जास्त मानधन घेते. मॉडेल व अभिनेत्री उर्वशी रौतेला एका मिनिटासाठी चक्क एक कोटी रुपये मानधन आकारते. 'डीएनए इंडिया'ने दिलेल्या माहितीनुसार, उर्वशी रौतेलाने तीन मिनिटांच्या गाण्यासाठी चक्क एक कोटी रुपयांचं मानधन स्वीकारलं होतं. या अभिनेत्रीनं 'स्कंद' चित्रपटात 'कल्ट मामा' गाण्यावर डान्स केला. या तीन मिनिटांच्या गाण्यासाठी उर्वशीनं चक्क तीन कोटींचं मानधन घेतलं होतं. म्हणजेच एका मिनिटासाठी उर्वशीनं एक कोटी रुपये मानधन घेतलं. त्यामुळे एका मिनिटासाठी एक कोटी मानधन घेणारी ती भारतातली पहिलीच अभिनेत्री ठरली.याआधी उर्वशी रौतेलानं चिरंजीवी अभिनीत 'वॉल्टेअर वीरैया'मधील गाण्यासाठी दोन कोटी रुपये मानधन घेतलं होतं. उर्वशी रौतेलाचे इन्स्टाग्रामवर ७१ दशलक्षांहून अधिक फॉलोअर्स आहेत आणि तिची एकूण संपत्ती ५५० कोटींहून अधिक असल्याचा अंदाज आहे. उर्वशी रौतेला 'फोर्ब्स'च्या टॉप १० मध्ये समाविष्ट होणारी सर्वांत तरुण भारतीयदेखील आहे.आता ही अभिनेत्री एका ६३ वर्षीय साऊथ सुपरस्टारबरोबर काम करण्यासाठी सज्ज झाली आहे. उर्वशी सध्या नंदामुरी बालकृष्णा यांच्यासह तिच्या 'एन बी के-१०९' या आगामी चित्रपटाची तयारी करीत आहे. चित्रपटातील ॲक्शन सीक्वेन्ससाठी तिला एम एम के

## सोनाक्षी सिन्हा-झहीरच्या लग्नाबद्दल मैत्रिणीची पोस्ट



सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इक्बाल यांनी २३ जून रोजी लग्न केलं. अजूनही या दोघांच्या लग्नाची सोशल मीडियावर चर्चा आहे. त्यांच्या लग्नातील अनेक फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर पाहायला मिळत आहेत. सोनाक्षी व झहीर यांच्या लग्नाला त्यांच्या मित्र-मैत्रिणींनी हजेरी लावली होती, त्यापैकी काही जणांनी अनसीन व्हिडीओ व फोटो शेअर केले आहेत.सोनाक्षी व झहीर दोघांचं आंतरधर्मीय लग्न होतं. त्यांनी नोंदणी पद्धतीने लग्न केलं. या लग्नात हिंदू धर्मातील रीतिरिवाजानुसार काही विधी झाले. त्यांच्या लग्नाच्या जवळपास १० दिवसांनी सोनाक्षीची मैत्रीण प्राची मिश्रा हिने एक सुंदर व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओत सोनाक्षी व झहीरचे लग्न तसेच रिसेप्शनची झलक पाहायला मिळते. या व्हिडीओबरोबर प्राचीने एक सुंदर कॅप्शन दिलं आहे. या कॅप्शनची चांगलीच चर्चा होत आहे.प्राची मिश्राने तिच्या इन्स्टाग्राम हँडलवर एक व्हिडीओ शेअर केला आहे ज्यात सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इक्बालच्या लग्नाची आणि रिसेप्शनची झलक पाहायला मिळते. व्हिडीओची सुरुवात त्यांच्या घरी लग्नाची नोंदणी झाल्यापासून होते. यात सोनाक्षी कागदपत्रांवर सही केल्यानंतर भावूक होते. त्यानंतर दोघांचा डान्स पाहायला मिळतो.कॅप्शनमध्ये प्राचीने व्हॉईस मेसेज आणि व्हिडीओ कॉलचा उल्लेख केला. लग्नाच्या एक दिवसाआधी प्राची वरपक्षाकडून होती आणि नंतर वधूपक्षाकडून झाली असं तिने सांगितलं. तिने सोनाक्षी व झहीरचं कौतुक केलं आणि माध्यमांमध्ये सुरू असलेल्या चर्चांचा या दोघांवरही काहीच परिणाम झाला नाही. पाहुण्यांना कोणत्याही अडचणी येणार नाहीत याची त्यांनी पूर्ण काळजी घेतली असंही तिने नमूद केलं.प्राचीने लिहिलं, जेव्हा मशिदीतील अजानचा आवाज मंत्रांमध्ये मिसळला तेव्हा ही परंपरा आणखीच खास झाली.

## शत्रुघ्न सिन्हा यांनी सोनाक्षीबद्दल खूप गोष्टी सांगितल्या

अभिनेते आणि राजकारणी शत्रुघ्न सिन्हा यांना काही दिवसांपूर्वी मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. शत्रुघ्न सिन्हा यांचा मुलगा लव सिन्हा याने इंडियन एक्सप्रेस.कॉमला याबाबत पुष्टी दिली होती. आता शत्रुघ्न सिन्हा यांनी त्यांच्या प्रकृतीबद्दल स्वत: माहिती दिली आहे.बॉलीवूड हंगामाने दिलेल्या वृत्तानुसार शत्रुघ्न सिन्हा म्हणाले, "ही एक नियमित तपासणी होती, काळजी करण्याची काहीच गरज नाही. मला वाटतं की गेल्या काही आठवड्यात अनेक गोष्टी घडल्याने आणि त्यातील उत्साहामुळे थोडा थकलो होतो. पण आता मी ठीक आहे आणि विश्रांती घेतोय."शत्रुघ्न सिन्हा यांना त्यांच्या मुलीचा म्हणजेच सोनाक्षीचा नेहमीच अभिमान वाटत आला आहे. सोनाक्षीबद्दल सांगताना शत्रुघ्न सिन्हा म्हणाले, "निर्माता म्हणून तिला बॉलीवूड इंडस्ट्रीत लॉन्च करण्यासाठी तिने मला कधीच विचारलं नाही. माझं नाव आणि प्रसिद्धी वापरून तिने कधीही चित्रपटांत भूमिका मिळवल्या नाहीत. हे सगळं तिने स्वत:च्या हिमतीवर केलंय. लोकं नेपोटिझमबद्दल बोलतात. पण या इंडस्ट्रीत असे अनेक कलाकार आहेत जे अयशस्वी झाले आहेत. अगदी माझ्याप्रमाणेच माझ्या मुलीने या इंडस्ट्रीत स्वत:चं स्थान निर्माण केलंय. फरक फक्त हाच आहे की तेव्हा माझ्याकडे काहीच पर्याय नव्हता. पण तिच्याकडे होता, तिला माझी मदत सहज घेता आली असती, पण तिने ती घेतली नाही."जेव्हा शत्रुघ्न सिन्हा यांना विचारण्यात आलं की ते आणि सोनाक्षी एकत्र स्क्रिनवर कधी दिसणार? यावर शत्रुघ्न सिन्हा हसले आणि म्हणाले की, "मला थोडं ते विचित्र वाटतं. माझ्यात आणि तिच्यात तुलना झालेली मला आवडणार नाही. मला माहित आहे की माझ्यापेक्षा ती जास्त आत्मविश्वासू आणि प्रतिभावान आहे. वडिल आणि अभिनेता या दोघांमध्ये खूप फरक आहे. माझ्या मुलांनी आयुष्यात जे काही साध्य केलं आहे त्याचा मला खूप अभिमान आहे.

# ‘मला लोकांसाठी ते बदलायचे आहे’!

## टीम इंडियातील निवडीनंतर परागचे मोठे वक्तव्य

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील पाच सामन्यांची टी-२० मालिका ६ जुलैपासून सुरू होत आहे. आसामचा फलंदाज रियाग पराग यालाही झिम्बाब्वेसाठी भारतीय संघात स्थान मिळाले आहे. त्याची प्रथमच भारतीय संघात निवड झाली आहे. परागने आयपीएल २०२४ मध्ये अप्रतिम कामगिरी केली होती. त्याने राजस्थान रॉयल्ससाठी १५ सामन्यांमध्ये ५२.०९ च्या सरासरीने ५७३ धावा केल्या, ज्यामध्ये चार अर्धशतकांचा समावेश आहे. आता परागचे स्वप्न पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्यापूर्वी त्याने आपल्या आयुष्यातील एक मोठे उद्दिष्ट सांगितले आहे.**




ईएसपीएन क्रिकइन्फोशी बोलताना रियान पराग म्हणाला, “मला मोठे होताना नेहमी वाटायचे की आपल्या भागातील लोक मोठे स्वप्न पाहण्यापासून थांबवतात. मला आता ते बदलायचे आहे. मी अद्याप (आंतरराष्ट्रीय खेळाडूच्या) पातळीपर्यंत पोहोचलो नाही. मला देशासाठी खेळायचे आहे. एकदा मी देशासाठी खेळायला लागल्यावर लोकांना कळेल की त्यांच्याकडे एक मार्ग आहे. मी आयपीएलमध्ये खेळलो आहे आणि लोकांना हे समजले आहे की तुम्ही आसामसारख्या लहान राज्यातून असलात तरीही त्या पातळीपर्यंत पोहोचू शकता.”तो पुढे म्हणाला, “परंतु आयपीएल इतके मोठे लक्ष्य असू शकत नाही. तुम्ही एक वर्ष खेळू शकता आणि नंतर गायब होऊ शकता. पण जेव्हा मी देशासाठी खेळेल, मला वाटते की खरा रोडमॅप तेव्हाच निश्चित होईल. त्यांना प्रत्यक्षात त्याचे पालन करण्याची गरज नाही. ते यासाठी स्वतःचा मार्ग तयार करू शकतात.” परागला त्याच्या कामगिरीसाठी आणि आयपीएल २०२४ च्या आधीच्या हंगामात मैदानाबाहेरील काही टिप्पण्यांमुळे खूप ट्रोलिंगचा सामना करावा लागला होता. पराग म्हणाला, “हे सोपे नाही. गेल्या वर्षभरानंतर मी स्वतःशी बोललो. या प्रकारचे पुनरागमन वैयक्तिक आहे. कारण मला अशा गोष्टी सहन कराव्या लागल्या, ज्याच्यासाठी मी खरोखरच पात्र नव्हतो. कदाचित माझ्या तयारीत काही गोष्टींची कमतरता असेल, पण तरीही मला असे वाटते की मला इतक्या प्रमाणात ट्रोलिंगचा सामना करावा लागायला नको होता. पण मी काय करू शकतो? लोक पर्वा न करता काही ना काही बोलत राहतील. गेल्या वर्षी तो म्हणाला की मी आयपीएलमध्ये खेळण्यासाठी पुरेसा चांगला नाही. असेल लोकाना वाटत होते. आता त्यांना मी भारतीय संघात हवा आहे. त्यामुळे लोक अगदी स्विचप्रमाणे बदलतात.”ईएसपीएन क्रिकइन्फोशी बोलताना रियान पराग म्हणाला, “मला मोठे होताना नेहमी वाटायचे की आपल्या भागातील लोक मोठे स्वप्न पाहण्यापासून थांबवतात. मला आता ते बदलायचे आहे. मी अद्याप (आंतरराष्ट्रीय खेळाडूच्या) पातळीपर्यंत पोहोचलो नाही. मला देशासाठी खेळायचे आहे. एकदा मी देशासाठी खेळायला लागल्यावर लोकांना कळेल की त्यांच्याकडे एक मार्ग आहे. मी आयपीएलमध्ये खेळलो आहे आणि लोकांना हे समजले आहे की तुम्ही आसामसारख्या लहान राज्यातून असलात तरीही त्या पातळीपर्यंत पोहोचू शकता.”तो पुढे म्हणाला, “परंतु आयपीएल इतके मोठे लक्ष्य असू शकत नाही. तुम्ही एक वर्ष खेळू शकता आणि नंतर गायब होऊ शकता. पण जेव्हा मी देशासाठी खेळेल, मला वाटते की खरा रोडमॅप तेव्हाच निश्चित होईल. त्यांना प्रत्यक्षात त्याचे पालन करण्याची गरज नाही. ते यासाठी स्वतःचा मार्ग तयार करू शकतात.

### ‘लोक स्विचप्रमाणे बदलतात’

” परागला त्याच्या कामगिरीसाठी आणि आयपीएल २०२४ च्या आधीच्या हंगामात मैदानाबाहेरील काही टिप्पण्यांमुळे खूप ट्रोलिंगचा सामना करावा लागला होता.पराग म्हणाला, “हे सोपे नाही. गेल्या वर्षभरानंतर मी स्वतःशी बोललो. या प्रकारचे पुनरागमन वैयक्तिक आहे. कारण मला अशा गोष्टी सहन कराव्या लागल्या, ज्याच्यासाठी मी खरोखरच पात्र नव्हतो. कदाचित माझ्या तयारीत काही गोष्टींची कमतरता असेल, पण तरीही मला असे वाटते की मला इतक्या प्रमाणात ट्रोलिंगचा सामना करावा लागायला नको होता. पण मी काय करू शकतो? लोक पर्वा न करता काही ना काही बोलत राहतील. गेल्या वर्षी तो म्हणाला की मी आयपीएलमध्ये खेळण्यासाठी पुरेसा चांगला नाही. असेल लोकाना वाटत होते.

# माझं लक्ष्य एकच होतं तो चेंडू पकडायचा

## फायनलमधील कॅचबद्दल सूर्यकुमारचा मोठा खुलासा

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाने टी-२० विश्वचषक २०२४ च्या अंतिम सामन्यात रोमहर्षक विजय मिळवत ट्रॉफी उंचावली. भारताला विजयाच्या दिशेने नेणारा या सामन्यातील प्रत्येक क्षण सर्वांच्या कायम लक्षात राहणार आहे. त्यातील मोठा आणि चर्चेचा ठरलेला क्षण म्हणजे सूर्यकुमार यादवचा झेल. सूर्यकुमार यादवने सीमारेषेजवळ डेव्हिड मिलरचा एक अनपेक्षि झेल यशस्वीपणे टिपला.**




सूर्याच्या या झेलनंतर त्याच्या व्हॉट्सॲपवर तब्बल १०१४ मेसेज होते. इतके मेसेज याआधी त्याला कधीच आले नव्हते. भारताच्या या शानदार विजयानंतर आणि सूर्याच्या त्या आश्चर्यकारक झेलची सर्वत्र चर्चा आहे. या झेलबद्दल सांगताना एक नवीन खुलासा केला आहे.अंतिम सामन्यातील अखेरच्या षटकातील पहिलाच चेंडू हार्दिक पंड्याने लोअर फुल टॉस टाकला. या चेंडूवर मिलरने मोठा फटका मारला आणि चेंडू हवेत उंच गेला आणि षटकारासाठी जाणार असे वाटत होते. पण सीमारेषेबाहेर जाणारा हा चेंडू सूर्याने धावत येत टिपला, त्यानंतर त्याचा तोल जातो हे कळताच त्याने सीमारेषेबाहेर हवेत चेंडू उडवला आणि पुन्हा तो चेंडू टिपला. या सूर्याच्या यशस्वी झेलसह भारताने सामन्यात दणदणीत पुनरागमन केले. पण हा झेल टिपताना सूर्याच्या मनात नेमकं काय सुरू होतं, हे त्याने सांगितले. इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या मुलाखतीत सूर्यकुमार यादवने या झेलबद्दल सांगितले, “आमचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक टी दिलीप सरांनी सांगितले आहे की सूर्या, विराट कोहली, अक्षर पटेल आणि रवींद्र जडेजा यांनी नेहमी हॉटस्पॉट भागात क्षेत्ररक्षणासाठी उभं राहायचं, जिथे चेंडू जाण्याची सर्वाधिक शक्यता असते. मी मैदानात टिपला तसा झेल यशस्वीपणे टिपण्यासाठी वाऱ्याचा वेग पाहत अनेकदा सराव केला आहे. अंतिम सामन्यातील अखेरच्या षटकात मी थोडा वाईड अँगलला उभा होतो.

### मी शब्दात मांडूच शकत नाही

सूर्याने हा झेल टिपतानाचा रोहित शर्मा आणि त्याच्यामधील मैदानावरील प्रसंग सांगताना म्हणाला, “रोहित शर्मा सहसा कधीच लाँग ऑनवर फिल्डिंगसाठी उभा राहत नाही पण त्या अखेरच्या षटकात रोहित तिथे होता. त्यामुळे चेंडू जेव्हा माझ्या दिशेने येत होता, तेव्हा मी एका सेकंदासाठी रोहितकडे पाहिलं आणि रोहितने माझ्याकडे पाहिलं. तेव्हाच मी धावायला सुरूवात केली आणि माझं लक्ष्य एकच होतं तो चेंडू पकडायचा. जर रोहित शर्मा तिथे जवळ असता तर मी बाहेर चेंडू फेकला तेव्हा त्याच्या दिशेने फेकणार होतो. पण तेव्हा रोहित जवळपास दिसला नाही. त्या ४-५ सेकंदात जे काही घडलं ते मी शब्दात मांडूच शकत नाही.”सामन्यातील त्या ५ सेकंदांमध्ये मी त्या ठिकाणी होतो, यासाठी मी खूप कृतज्ञ आहे.”